# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०७/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## कळमेश्वर येथे अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्यांना केले जेरबंद
## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

दि. २५/०७/२०२२ रोजी कळमेश्वर परीसरात स्थानीक गुन्हे शाखा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर खबर दिली कि, बोरगाव कडून फेटरी मार्गाने ०२ इसम मोपेड क्र. एमएच ४० बीएस ७७६० व एमएच ४०–६२९२ ने स्वत: जवळ अंमली पदार्थ गांजा बाळगुन येरला गावात विक्री करीता घेवुन येणार आहे. प्राप्त खबरेची शहानिशा करणेकामी स्थागुशाचे पथकाने संत श्री आसाराम बापू आश्रम, बोरगांव रोड येथे नाकाबंदी सुरु केली असता रात्री २१.०० वाजताचे सुमारास आरोपी १) अभिषेक उर्फ अभिनेश देवशंकर वर्मा, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं. १, येरला पोस्ट फेटरी तह.जि. नागपूर आणि आरोपी २) साहील जनार्दन ढोणे, वय २० वर्ष, रा. वार्ड नं. १, हनुमान मंदीर मागे, ग्राम पंचायत जवळ, येरला या दोघांची वाहने नाकाबंदी दरम्यान तपासण्यात आली असता त्यांचे जवळ १ किलो १६८ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा मिळून आला. दोन्ही आरोपी हे येरला गावाचे रहीवासी असून गावात अवैधरित्या गांजा विक्री करण्याकरीता घेवून जात होते. आरोपीतांचे ताब्यात मिळुन आलेली वाहने हे आरोपी अभिषेक वर्मा याचे मालकीची असून होन्डा मोपेडच्या सिटखालील डिक्कीमध्ये गांजा बाळगुन मिळून आले. आरोपीतांचे ताब्यातुन अंमली पदार्थ, २ होन्डा कंपणीचे मोपेड, ०३ मोबाईल संच असा एकुण १,५८,५००/– रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर व अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार निलेश बर्वे, दिनेश आधापूरे, गजेन्द्र चौधरी, राजेन्द्र रेवतकर, पोलीस नायक अजीज दुधकनोज, सत्यशिल कोठारे, महीला पोलीस नायक नम्रता बघेल चालक पोकॉ सुमीत बांगडे तसेच सायबर सेलचे पोलीस नायक सतिष राठोड यांनी पार पाडली.



**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**